**वैयक्तीक लाभ – शासकिय आरोग्य संस्थेत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यावर दयावयाचे आर्थीक लाभ –**

**( रुपयात )**

| खर्चाची बाब | पुरुष नसबंदी ( सर्व लाभार्थ्यासाठी ) | स्त्री नसबंदी ( फक्त बीपीएल/एससी/एसटी लाभार्थ्यासाठी ) | स्त्री नसबंदी ( फक्त दारीद्रय रेषेवरील लाभार्थ्यासाठी ) | शेरा |
|---|---|---|---|---|
| लाभार्थ्यांना मोबदला | ११००/– | ६००/– | २५०/– | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यास जर लाभार्थी स्वतःहुन प्रवृत्त झाल्यास प्रवर्तकास देय असलेली रक्कम लाभार्थ्यास देण्यात यावी. |
| मतप्रवर्तकास | २००/– | १५०/– | १५०/– | |

**कुटुंब नियोजन विमा योजनेचा लाभ  कालावधी व त्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे –**

| **अ.क्र.** | **मुद्या** | **मोबदला** |
|---|---|---|
| १ | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करतांना दवाखान्यात किंवा दवाखान्यातुन सोडल्यानंतर ७ दिवसात मृत्यु झाल्यास | रुपये २ लक्ष |
| २ | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झाल्यावर दवाखान्यातुन घरी सोडल्यानंतर ८ ते ३० दिवसात मृत्यु झाल्यास | रुपये ५०,०००/– |
| ३ | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया असफल झाल्यानंतर ( मुलाचा जन्म झाला असो किंवा नसो ) | रुपये ३०,०००/– |
| ४ | कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर दवाखान्यातुन घरी सोडल्यानंतर ६० दिवसाच्या कालावधीत गुंतागुंत झाल्यास देय रक्कम | प्रत्यक्ष खर्च परंतु रुपये २५,०००/– च्या मर्यादेत |
| ५ | इन्डेमनिटी  इन्शुरेन्स – प्रति डॉक्टरासाठी एका वर्षात चार वेळेपेक्षा जास्त नाही. | रुपये २ लक्ष प्रती दाव्यासाठी |

**मृत्यु प्रकरणी लागणारी आवश्यक कागदपत्रे –**

१) क्लेम फार्म ( गुणवत्ता अभिवचन समिती प्रमाणपत्र )
२) संमती पत्र
३) मृत्यु प्रमाणपत्र
४) शस्त्रक्रियेबाबत चे प्रमाणपत्र

**असफल प्रकरणी लागणारी आवश्यक कागदपत्रे -**

१) क्लेम फार्म ( गुणवत्ता अभिवचन समिती प्रमाणपत्र )
२) संमती पत्र
३) शस्त्रक्रियेबाबत चे प्रमाणपत्र
४) असफलबाबत पुरावा
   अ) लघवी तपासणी अहवाल
   ब) यु.एस.जी. अहवाल
   क) पोटावरुन तपासणीचा अहवाल
   ड) गर्भपात केले असल्यास अहवाल
   इ) विर्य तपासणी अहवाल ( पुरुष शस्त्रक्रिया )

**गुंतागुंत पकरणी लागणारी आवश्यक कागदपत्रे-**

१) क्लेम फार्म ( गुणवत्ता अभिवचन समिती प्रमाणपत्र )
२) संमती पत्र
३) शस्त्रक्रियेबाबत चे प्रमाणपत्र
४) मुळ देयके व निदान अहवाल
५) उपचार केल्याबद्दल वैद्यकिय अधिकारी यांचे निदान अहवाल

## सवित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषीक योजना

**योजनाची माहीती -** दारीद्रय रेषेखालील जोडप्यांना मुलगा नसतांना त्यांनी एक किंवा दोन मुलींच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन श्स्त्रक्रिया करुन घेतल्यास त्यांच्या मुंलीकरीता विशेष प्रोत्साहनात्मक योजना.

**सदर योजनेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे-**

१) प्रपत्र अ येथे दिलेल्या विहीत नमुन्यात भरलेला अर्ज
२) प्रपत्र ब शस्त्रक्रिया केल्या संबधीचे वैद्यकिय अधिकारी यांचे प्रमाणपत्र.
३) सिधा वाटप ( राशनकार्ड ) ची झेरॉक्स प्रत
४) शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत माध्यमिक उत्तीर्ण झाल्याचा दाखला किंवा ग्राम पंचायत नगरपीलका किंवा महानगरपालीकेने दिलेले जन्माचे प्रमाणपत्र यापैकी कोणत्याही एका प्रमाणपत्रची प्रत
५) ग्रमिण भागाकरीता गटविकास अधिकारी किंवा तहसीलदार यांनी सदर कुटुंब दारीद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये समाविष्ट असल्याबाबत दिलेले प्रमाणपत्राची प्रमाणीक प्रत
६) शहारी भागाकरीता नगरपालीक/ महानगरपालीका यांनी सदर कुटुंब दारीद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये समविष्ट असल्याबाबत दिलेल्या प्रमाणपत्राची प्रमाणीक प्रत
७) अधिवास प्रमाणपत्र ( डोमेशीयल सर्टीफिकेट)
८) लाभार्थी हा दारीद्रय रेषेखालील कुटुंबाचा यादीमधीलच असावा.

९) पती किंवा पत्नीने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया राज्यातील शासन मान्य संस्था अथवा नोंदणीकृत वैद्यकिय व्यवसायीक रुग्णालयात दिनांक १.४.०७ रोजी अथवा तदनंतर केली असावी.

१०) पती किंवा पत्नी पैकी कोणीही यापूर्वी निर्बीजीकरण शस्त्रक्रिया केलेली नसावी.

११) सदर योजनेच्या लाभार्थींना फक्त एक अथवा दोन मुली असाव्यात परंतु मुलगा मात्र नसावा.

**कालावधी –** एक मुलगी असल्यास त्यामुलीचे वय एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर आणि दोन मुली असल्यास दुस–या मुलीचे वय १ वर्ष पुर्ण झाल्यानंतर अर्जदारास उक्त अर्जात संपूर्ण माहीती भरुन सदर अर्ज कागदपत्रसहीत लाभार्थीने शस.ाक्रिया केल्यापासुन ३ वर्षाच्या आत साबदर करणे आवश्यक आहे.